Estd:1962
NAAC 'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प रि प त्र क

विद्यापीठातील सर्व अधिविभागप्रमुख व प्रशासकीय विभागप्रमुख यांना कळविण्यात येते की, विद्यापीठ परिसरात विविध विभागामार्फत वृक्षारोपण केले जाते. परंतु काही विभागाने इमारतीजवळ व फुटपाथ नजीक वृक्षारोपण केल्याचे कार्यालयाच्या निदर्शनास आले आहे. इमारतीच्या शेजारी झाडे मोठी झाल्यानंतर झाडांच्या फांदया तोडण्यासाठी संबंधित विभागाकडून अभियांत्रिकी व उद्यान विभागाकडे वारंवार मागणी केली जाते. मोठया झाडांच्या फांदया तोडणे किंवा झाडे काढणेकरिता कोल्हापूर महानगरपालीका वृक्षप्राधिकरणाची परवानगी घ्यावी लागते. वृक्षारोपण करताना इमारतीच्या किमान २० फुट अंतरावर वृक्ष प्रवर्गातील व इमारतीजवळ झुडूप प्रवर्गातील झाडे लावणे योग्य ठरते. तसेच या संदर्भात उद्यान विभागाकडून पुर्वमाहिती घेतल्यास भविष्यात अडचणी उद्‌भवणार नाहीत. तसेच Lead Botanical Garden परिसर वगळता अन य ठिकाणी वृक्ष लागवडीचे धोरण व वृक्ष निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार कार्यवाही करावी. तसेच आपल्या विभागामार्फत वृक्षारोपण करणेपूर्वी उद्यान विभागाशी संपर्क साधावा.

कुलसचिव

जा.क्र.आस्थापना/ 1995
दिनांक : 21 JUL 2017

प्रति,

१. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक
२. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहाय्यक कुलसचिव व समकक्ष अधिकारी.
३. सर्व प्रशासकीय विभागप्रमुख
४. स्वीय सहाय्यक, मा.कुलगुरु, मा. प्रभारी प्र–कुलगुरु, कुलसचिव, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ व वित्त व लेखा अधिकारी यांना माहितीसाठी
५. इंटरनेट विभाग– सदरचे परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. (Intranet)